# देवाकडे आम्ही आमच्या हातून घडलेल्या वांईट गोष्टींची कबूली देतो
# बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाच्या सेवेचे कार्य



मुलांचे वय व गरजा ह्यांना अनुरूप असे कार्यक्रम निवडा.



**प्रार्थना,** ''प्रिय प्रभु, प्रत्येक मुलाने आपले पातक तुझ्याजवळ कबूल करावे साठी त्यांचे सहाटय कर. यामुळे तुला त्यांची पातकांची साखळी तोडता येईल, त्यांची लाजिरवाणी स्थिती व वाईट सवयी यापासून सुटका करता येईल, अणि मग प्रत्येक मुला- मुलीचा विवेकभाव शुद्ध कर आमचे ऐक, आमची क्षमा कर आणि आमच्या अंत: करणांत शांती नांदू देत.

बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाने लोकांना त्यांची पातके देवाकडे कबूल करून पापक्षमा मिळविण्यासाठी कशा प्रकारे साहाय्य केले ते मोठया माणसांनी किंवा मोठया मुलाने सांगावे, शिकवण्याची तयारी करण्यासाठी **मत्तय 3:1-12** व **लूक 3:10-18** हे शास्त्रभाग वाचा, वृत्तांत सांगून झाल्यावर मुलांना हेच पुढील प्रश्न विचारा:

- बाप्तिस्मा करणारा योहान लोकांना कोठे शिक्षण देत असे? *(मत्तय 3:1)*
- योहान लोकांना काय करायला सांगत होता? *(मत्तय 3:1)*
- त्यांनी पश्चाताप केला आहे हे दाखवण्यासाठी त्यांनी कोणत्या दोन गोष्टी केल्या? *(मत्तय 3:6)*
- 'पश्चाताप' म्हणजे काय? *(आमच्या पातकांपासून मागे फिरून देवाच्या आज्ञा पाळणे)*
- आपल्या पातकांची कबूली देण्याची गरजच नाही इतके आम्ही चांगले आहोत असे स्वत:ला म्हणाऱ्यांना योहान काय म्हणतो? *(मत्तय 3:7-11. बाप्तिस्मा घेण्यास नकार देणाऱ्यांना तो सापांची पिल्ले म्हणतो आणि त्यांना येणाऱ्या न्यायाविषयी इशारा देतो.)*
- ''माझ्या मागुन जो येत आहे तो माझ्यापेक्षा समर्थ आहे'' असे योहान म्हणतो तेव्हा तो कोणाबद्यल बोलत आहे? *(तो येशू विषयी बोलत आहे)*
- येशू काय करणार आहे असे योहान सांगतो? *(मत्तय 3:11-12. पश्चाताप करणाऱ्यांचा येशू पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा करणार आणि इतरांचा न्याय करून त्यांना शिक्षा करणार.)*
- आपण पश्चाताप केला हे दाखवण्यासाठी योहान लोकसमुदायाला काय करण्यास सांगतो? *(लूक 3:10-11)*
- लोभी जकातदारांचा बाप्तिस्मा केल्यावर योहान त्यांना काय करायला सांगतो? *(लूक 3:12-13)*
- योहानाने शिपायांना काय करावयास सांगितले? *(लूक 3:14)*

लोक आपआपली पातके कबूल करतात ह्या वृत्तांताच्या भागांचे **नाट्यीकरण करा.**

- मुलांना मोठया माणसांसमोर नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करा.
- मुलांना शिकवताना तुम्ही नाटिकेची तयारी करा.
- **मोठया मुलांनी** लहान मुलांची तयारी करून घ्यावी
- योहान, परूशी, निवेदक आणि मुलगी ह्या भूमिका **मोठया मुलांना** किंवा प्रौढांना करायला द्या.
- जकातदार, शिपाई आणि यहुदियातील लोक ह्या भूमिका पौढांना किंवा **लहान मुलांना** करायला द्या.

**निवेदक:** मत्तय 3:1-12 ह्या शास्त्रभागातून वृत्तांताचा पहिला भाग सांगा. मग म्हणा, ''यरूशलेमे मधील पश्चाताप केलेली ही मुलगी काय म्हणते ते ऐका''

**मुलगी:** ''आम्ही यहुदिया व यरूशलेमेमधे राहणाऱ्या लोकांनी अनेक वाईट गोष्टी केल्या पण आमच्या पैकी अनेकांची स्वत: मध्ये बदल करून देवाचे आज्ञापालन करण्याची इच्छा आहे. मी माझी पातके कबूल करते''

**योहान:** ''देवाने तुझी क्षमा केली आहे. ये आणि बाप्तिस्मा घे,''

**परूशी:** (गर्वाने बोला)''आम्ही परूशी धार्मिक पुढारी आहोत आणि चांगले जीवन जगतो. चांगली कृत्ये करून आम्ही देवाची मर्जी संपादन केली आहे म्हणून आम्हाला बाप्तिस्मा मिळणारच आहे!''

**योहान:** ''अहो सापांच्या पिलांनो, भावी क्रोधापासून पळावयास तुम्हांला कोणी सावध केले? तुमच्यामध्ये बदल झाला आहे आणि तुम्ही देवाचे आज्ञापालन करीत आहात हे दिसावे म्हणून याला योग्य असे फळ द्या!''

**निवेदक:** लूक 3:10-18 ह्या शास्त्रभागातून वृत्तांताचा दुसरा भाग सांगा मग म्हणा, ''लोभी जकातदार काय म्हणतो ते ऐका.''

**जकातदार:** ''आम्ही स्वार्थी आणि वाईट गोष्टी केल्या आहेत, आम्ही काय केले पाहिजे?''

**योहान:** ''तुम्हांस जे नेमून दिले आहे त्यापेक्षा अधिक काही घेऊ नका. तुम्ही तुमची पातके कबूल केली आहेत. देवाने तुम्हांला क्षमा केली आहे, या आणि बाप्तिस्मा घ्या.''

**शिपाई:** ''आम्हा शिपायांचे काय, आम्ही काय करावे? आमच्या हातूनही बरीच पातके घडली आहेत''

**योहान:** कोणावर जबरदस्ती करू नका व कुभांड आणू नका, तर तुम्हांला मिळणाऱ्या पगारात समाधानी असा तुम्ही तुमची पातके कबूल केली आहेत देवाने तुम्हांला क्षमा केली आहे. या आणि बाप्तिस्मा घ्या.''

**निवेदक:** नाटिकेसाठी मदत करणाऱ्या सर्वांचे आभार माना.



**प्रश्न:** मुलांनी ही नाटिका प्रौढांसाठी सादर केली असेल तर वर दिलेले प्रश्न त्यांना मोठया माणसांना विचारु द्या.

**अग्नीचे चित्र काढा,** मुले ते मोठया माणसांना उपासनेच्या दरम्यान दाखवतील त्यांना समजावून सांगू द्यात की, येशू मेलेल्यांना पुन्हा उठविल ते पिक गोळा करण्यासारखे असेल:

- विश्वासणारे सर्वकालासाठी येशू बरोबर राहणार आहेत.
- पिक गोळाकरणारा ज्याप्रमाणे धान्यापासून भूस बाजूला काढून जाळतो त्याप्रमाणे देवाला नाकारणाऱ्यांना तो वेगळे करील.



**कविता** मुलांना **स्तोत्र 51** मधुन पुढील वचने म्हणायला सांगा:

2: मला धुऊन माझा दोष पूर्णपणे काढून टाक, माझे पाप दूर करुन मला निर्मळ कर.

3: कारण मी आपले अपराध जाणून आहे, माझे पाप माझ्यापुढे नित्य आहे.

4: तुझ्याविरुद्ध तुझ्याविरुद्धच मी पाप केले आहे, तुझ्या दृष्टी ने जे वाईट ते भी केले आहे.

5: पाहा, मी जन्माचाच पापी आहे, माझ्या आईने गर्भधारण केले तेव्हांचाच भी पातकी आहे.

7: एजोबाने माझा पापमल काढ म्हणजे भी निर्मळ होईन, मला धू म्हणजे मी बर्फाहून शुभ्र होईन

10: हे देवा, माझ्या ठायी शुद्ध हृदय उत्पन्न कर; माझ्या ठायी स्थिर असा आत्मा पुन्हा घाल.

आमची पातके कबूल करणे आणि पापांची क्षमा मिळणे ह्याविषयी **कविता** किंवा गीत मोठया मुलांना लिहिण्यास सांगा,

**पाठ करा स्तोत्र 51:10**

Copyright 2005 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net